**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**परिपत्रक**

२०२०-२१

क्र.प्रले(वित्त)/प्रकल्प/२० दिनांक २०.०८.२०२०

**विषय:** बृहन्मुंबई महानगरपालिकेची कामे करणाऱ्या कंत्राटदारांना कोव्हिड-१९च्या अनुषंगाने Performance Guarantee परत करुन सहाय्य (relief) देणेबाबत.

**संदर्भ:** १) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण१०२०/प्र.क्र./१००/ २०२०–व्यय-१२ दिनांक २९ जूलै, २०२०

२) परिपत्रक क्र.उपप्रले/व्यय/ I/०६ दिनांक १०.०८.२०२०

कोरोना साथीच्या प्रादुर्भावामुळे महानगरपालिकेचे काम करणाऱ्या कंत्राटदारांना चालू कंत्राटामध्ये सोसाव्या लागत असलेल्या विविध अडचणीबाबत उपाययोजना व सहाय्य करण्याबाबत केंद्र सरकार व राज्य सरकारच्या धर्तीवर, परिपत्रक निर्गमित करुन विविध उपाययोजना व सहाय्य देण्यात आलेले आहे. तथापि, या अनुषंगाने प्राप्त झालेल्या सूचनांच्या अनुषंगाने महापालिकेतील कंत्राटदारांना Performance Guarantee बाबत उपरोक्त संदर्भित परिपत्रक क्र.२ मधील नमूद सवलती व्यतिरिक्त खालीलप्रमाणे अतिरिक्त सवलत देण्यात येत आहे :-

१. दिनांक २५.०३.२०२० पूर्वी चालू झालेल्या/मंजूर झालेल्या/निविदा प्राप्त झालेल्या/ निविदा मागविलेल्या सर्व कामांसाठी प्राप्त केलेले/करावयाचे कार्यानुरुप हमीपत्र (Performance Guarantee) संबंधीत कंत्राटदारास परत करण्यात यावे किंवा नव्याने घेण्यात येऊ नये.

२. ज्या कामाबाबत कोणतीही चौकशी प्रलंबित आहे अशा कामांना सदर सवलत लागू असणार नाही.

३. दिनांक २५.०३.२०२० पूर्वी चालू झालेल्या/मंजूर झालेल्या/निविदा प्राप्त झालेल्या/निविदा मागविलेल्या सर्व कामांसाठी प्राप्त केलेले कार्यानुरुप बँक हमीपत्र (Performance Guarantee) परत केल्यानंतर त्या कामासाठी घेतलेली २% कंत्राट अनामत रक्कम व उर्वरित

२.५% रिटेन्शन मनी अशी एकूण ४.५% रकमेची हमी संबंधित कंत्राटदारास परत करताना कामाचा दोष दायित्व निवारण कालावधी शिल्लक असल्यास त्या प्रकरणी पुढील दोष दायित्व कालावधी पूर्ण होईपर्यंत हमी म्हणून खालील सुत्रानुसार संबंधित कंत्राटदाराकडून दोष दायित्व कालावधी संपेपर्यंत वैध असणारे बँक हमीपत्र घेणे आवश्यक असेल.

| **Offer** | **PG applicable %** |
|---|---|
| For premium, at par and rebate 0 to 12% | PG = 0.92% x contract sum |
| For rebate of 12.01% and more | PG = {0.92% x contract sum} + (X) x contract sum where X = percentage rebate quoted more than 12%. |

तथापि, वरील सूत्राप्रमाणे परिगणित होणाऱ्या कार्यानुरुप बँक हमीपत्राची रक्कम ही कंत्राट समच्या ४.५% इतक्या कमाल मर्यादेपर्यंत सिमित ठेवावी.

४. वरीलप्रमाणे कार्यानुरुप बँक हमीपत्र घेणे हा महानगरपालिकेचा अधिकार असेल आणि तो कंत्राटदारास बंधनकारक असेल. त्यास संमती असल्याबाबतचे रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतीज्ञापत्र कंत्राटदाराकडून प्राप्त करुन संबंधित प्रमुख अभियंता यांनी सदर कार्यानुरुप हमीचा परतावा शिफारशीसह प्रमाणित करणे आवश्यक राहील.

सदरहू सवलत ही दिनांक ३१.०३.२०२२ पर्यंत लागू असेल.

**प्रमुख लेखापाल (पा.पु.म.नि.)** **प्रमुख लेखापाल (वित्त)प्र.**

**अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प)** **महानगरपालिका आयुक्त**